महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

पी-आर-३/जीवन संजीवनी/ NO 0 47 41 | दिनांक : 23 FEB 2012

## वाणिज्य परिपत्रक क्र. १५८

**विषय :-** **ग्रामिण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी लागू केलेल्या "जीवन संजीवनी "योजनेला ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ.**

**संदर्भ :-**
१. शासन निर्णय क्र.ग्रा.पा.धो.-११०९/प्र. क्र.०२०/पापु ०७ दि.१५ जून २००९.
२. वाणिज्य परिपत्रक क्र.९६ दि.२० जुलै २००९ .
३. शासन निर्णय क्र. ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१८५/पापु-०७ दि.२३.३.२०१०.
४. वाणिज्य परिपत्रक क्र. ११५ दि.१८ मे २०१०.
५. वाणिज्य परिपत्रक क्र.११९ दि.२१ जुलै २०१०.
६. शासन निर्णय क्र.ग्रा.पा.धो.-१९१९/प्र. क्र.२३६/पापु ०७ दि. ०३ सप्टेंबर २०११.
७. मंडळ ठराव क्र. १६०८ दि. २९/१२/२०११.

***********

वरील संदर्भातील अ.क्र.१ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी "जीवन संजीवनी" योजना लागु करण्यात आलेली होती. सदर योजना वरील संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकाद्वारे सर्व क्षेत्रिय कार्यालयांना अंमलबजावणी करीता कळविण्यात आलेली होती. सदर योजना ही राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणा-या ग्राहक संस्थांना (ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) लागू होती.

सदर योजनेनुसार ग्राहक संस्थांना ५०% मुळ थकबाकीची रक्कम भरुन योजनेत सहभागी होत असल्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात महावितरणकडे दि. ३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत सादर करावयाचा होता व उर्वरित ५०% रक्कमेचा ३१ ऑक्टोंबर २०१० पर्यंत ६ समान हप्त्यात भरणा करावयाचा होता.

या योजनेला मिळालेला प्रतिसाद बघता ज्या ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता आले नाही, अशा ग्राहक संस्थांनासुध्दा या योजनेमध्ये सहभागी होता यावे यासाठी शासनाने संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये "जीवन संजीवनी" योजनेस दि.३१ ऑक्टोबर २०१० पर्यंत मुदत वाढ दिलेली होती व सदर मुदतवाढीबद्दल सर्व क्षेत्रिय कार्यालयांना क्र. ४ च्या वाणिज्य परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. सदर मुदतवाढ दिल्यामुळे ३१.१०.२०१० पर्यंत सहभागी झालेल्या ग्राहक संस्थांना त्यांच्याकडे थकीत असलेल्या ५०% मुळ थकबाकीचा भरणा दोन दोन महिन्याच्या कालावधीत म्हणजेच ३१.१०.२०११ पर्यंत पूर्ण करावयाचा होता.

सदर योजनेस ऑक्टोबर २०१० पर्यंत मुदतवाढ दिल्यानंतरसुध्दा ज्या ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता आले नाही ही बाब लक्षात घेता शासनाने संदर्भातील क्र. ६ च्या निर्णयान्वये "जीवन संजीवनी" योजनेस **३१ मार्च २०१२** पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. ज्या ग्राहक संस्थांना विविध कारणांमुळे यापूर्वी भाग घेता आला नाही अशा सर्व ग्राहक संस्थांना या योजनेत आता सहभाग घेता येईल असेही शासनाने सदर निर्णयात स्पष्ट केलेले आहे.

जीवन संजीवनी योजनेस ३१ मार्च २०१२ पर्यंत शासनाने दिलेल्या मुदतवाढीमुळे या योजनेत अद्यापपर्यंत सहभागी झाल्या नव्हत्या अशा ग्राहक संस्थांना ३१ मार्च २०१२ पर्यंत त्यांच्याकडे असलेल्या सप्टेंबर २००९ च्या देयकात समाविष्ट थकबाकीच्या मुळ थकबाकीपैकी ५०% रकमेचा भरणा करुन सदर योजनेत सहभागी होत असल्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडे ३१ मार्च २०१२ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ५०% रकमेचा भरणा केलेला व या योजनेत सहभागी होत असल्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेल्या ग्राहक संस्थांना या योजनेच्या नियमानुसार उर्वरित ५०% मुळ थकबाकीचा भरणा ३१ मार्च २०१२ नंतर दोन दोन महिन्याच्या कालावधीत म्हणजेच ३१ मार्च २०१३ पर्यंत करावा लागेल.

ज्या संस्था या योजनेमध्ये पूर्वी सहभागी झाल्या होत्या परंतु काही कारणास्तव त्यांनी नियोजित हफ्ते अथवा चालु देयकांचा भरणा विहित कालावधीत केलेला नसेल व ज्यांना या योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा सर्व संस्थांनासुध्दा या योजनेत सहभागी होता येईल. मात्र यासाठी थकीत राहिलेल्या हप्त्यांची रक्कम व त्यासोबत चालू विज देयकाचा भरणा व्याज व विलंब आकारासह ३१ मार्च २०१३ पर्यंत करणे आवश्यक आहे.

"जीवन संजीवनी" योजनेच्या इतर अटी व शर्ती वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ दि. २० जुलै २००९ व वाणिज्य परिपत्रक क्र.११९ दि.२१ जुलै २०१० प्रमाणे कायम असुन त्यामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ दि. २०.०७.२००९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे परिशिष्ट अ, ब व क ग्राहक संस्थांकडून प्राप्त करुन घेण्यात यावे.

तरी सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, जीवन संजीवनी योजनेला दिलेल्या मुदतवाढी बद्दल स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिद्धी देऊन योजना यशस्वीपणे अंमलात आणावी.

**संचालक (संचलन)**

**प्रत रवानाः प्रेषण यादी**

D:\आरबीबी\PWW Sanjivani\Jeeva Sanjivani_Extention upto 31.03.12.doc